# मंत्रिमंडळ निर्णय

## ३० सप्टेंबर २०१५

## ( मंत्रिमंडळ बैठक क्र. ४९ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | महसुलातील घट थांबविण्यासाठी<br>पेट्रोल, डिझेलवर प्रतिलिटर दोन रूपये कर | वित्त |
| २ | ग्रीन एनर्जी कॉरिडॉर कार्यक्रमांतर्गत<br>३६७ कोटींच्या २७ योजनांना मान्यता | ऊर्जा |
| ३ | केंद्र शासनाच्या अमृत अभियानाची<br>राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय | नगरविकास |
| ४ | कला, कार्यानुभव आणि शारिरीक शिक्षण विषयांचे शिक्षण<br>उच्च प्राथमिक शाळांमध्ये अतिथी निदेशकांचे पॅनल | शालेय शिक्षण |
| ५ | आयआयएमसीच्या विभागीय केंद्रासाठी<br>अमरावतीसाठी जमीन देण्याचा निर्णय | महसूल |
| ६ | पश्चिम विभागीय केंद्रीय इलेक्ट्रिकल टेस्टिंग लॅब<br>नाशिक येथे स्थापन करण्यास मान्यता | महसूल |
| ७ | इंदू मिलच्या जागेवरील डॉ.बाबासाहेबांच्या स्मारकासाठी<br>शशी प्रभू अँड असोसिएट्च्या आराखड्याची निवड | नगर विकास |
| ८ | जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास<br>सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास बंदी | नगर विकास |

**इतर**

**पाऊस/पीक-पाणी**

१. राज्यात सरासरीच्या ६०टक्के पाऊस, ५६ टक्के पाणीसाठा

-----

**बातमी :**

२. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचा सत्कार

## महसुलातील घट थांबविण्यासाठी
## पेट्रोल, डिझेलवर प्रतिलिटर दोन रूपये कर

राज्य शासनाकडून गेल्या काही दिवसात घेण्यात आलेल्या लोकोपयोगी निर्णयांमुळे झालेला खर्च व पेट्रोल-डिझेलच्या कमी झालेल्या किंमतीमुळे राज्य शासनाच्या महसुलात झालेली घट यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलवर प्रतिलिटर दोन रूपये कर वाढविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यासोबतच उलाढालीची मर्यादेची अट न ठेवता पेट्रोल आणि डिझेलवरील स्थानिक संस्था कर सरसकटपणे रद्द करण्यात आला आहे.

राज्य शासनाने १ ऑगस्ट २०१५ पासून ५० कोटीखालील उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांवरील स्थानिक कर रद्द केला आहे. त्यामुळे सर्व वस्तुवरील कराचा बोजा कमी झाला आहे. तसेच मद्य, सिगारेट, वायुमिश्रीत शितपेये यांच्यावरील ५ ते ७ टक्के एलबीटी रद्द झाला आहे. महसूल निर्मितीसाठी या वस्तूंवर पाच टक्के विक्रीकर वाढविण्यात आला आहे. तसेच हिरे-सोने व त्यांचे दागिने यांच्यावरील कर एक टक्क्यांवरून १.२० टक्के करण्यात येत आहे. या सुधारित कर प्रस्तावांमुळे येत्या पाच महिन्यात सुमारे १६०० कोटी रूपयांचा महसूल शासनास प्राप्त होणार आहे. या सर्व दरांचे पुनर्विलोकन येत्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात करण्यात येणार असून वस्तू व सेवा कर प्रणालीशी (जीएसटी) सुसंगत दर राखण्यासाठी दीर्घकालीन धोरण आखले जाणार आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील घडामोडीमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत घट झाली आहे. याचा परिणाम म्हणून त्यावरील जमा होणाऱ्या विक्री करात घट झाली आहे. या कमी झालेल्या किंमतीमुळे प्राप्त होणाऱ्या महसूलात सुमारे ३०० कोटी रूपये प्रतिमहिना घट झाली आहे. त्यामुळे प्रतिलिटर दोन रूपयांचा कर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या करवाढीनंतरही राज्यातील पेट्रोलवरील कराचा दर आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, पंजाब, कर्नाटक, केरळ या राज्यांपेक्षा कमी असणार आहे.

गेल्या वर्षभरात राज्य सरकारकडून राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवरील खर्चाचा भार वाढता आहे. याशिवाय नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या पीक नुकसानीपोटी ४२१.७४ कोटींची भरपाई संबंधितांना देण्यात आली आहे. तसेच घरांच्या दुरूस्तीसाठी २० कोटी, पिकविम्यासाठी ६९०.७४ कोटी, आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना कर्जावरील व्याजमाफीसाठी ६० कोटी, कर्ज रूपांतरणासाठी ११७.५९ कोटी, धान उत्पादकांसाठी ७२.५० कोटी, पीक नुकसानीकरिता शेतकऱ्यांना १ हजार कोटीची भरपाई तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अन्न सुरक्षेचा लाभ देण्यासाठी ९५० कोटी रुपये खर्चाचा अतिरिक्त भार सरकारच्या तिजोरीवर पडला आहे. यासोबतच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पेट्रोल व डिझेलच्या कमी झालेल्या किंमतीमुळे राज्य शासनाच्या विक्रीकराच्या महसुलात दरमहा ३०० कोटी रुपयांची घट झाली आहे. या साऱ्या बाबींमुळे हा करवाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, त्यासोबतच शासन वित्तीय शिस्त पाळण्यासाठीही विविध पातळ्यांवर कसोशीने प्रयत्न करीत आहे.

-----o-----

## ग्रीन एनर्जी कॉरिडॉर कार्यक्रमांतर्गत
## ३६७ कोटींच्या २७ योजनांना मान्यता

मोठ्या प्रमाणात नवीकरणीय ऊर्जा निर्माण करुन ती निष्कासित (Evacuation) आणि पारेषित करण्यासाठी पायाभूत पारेषण आराखडा उभारण्यात येत आहे. केंद्राच्या ग्रीन एनर्जी कॉरीडॉर (GEC) कार्यक्रमानुसार हा आराखडा राज्यात राबविण्यासाठी महापारेषणने आखलेल्या २७ योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या ३६७ कोटींच्या अंदाजित खर्चास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या योजनांच्या माध्यमातून २५७० मेगावॅट अतिरिक्त ऊर्जा निर्माण होणार आहे.

ग्रीन एनर्जी कॉरीडॉर कार्यक्रमासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चाच्या रकमेपैकी २० टक्के रक्कम (७३.४ कोटी) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या अंतर्गत निधीतून उभारण्यात येणार असून ४० टक्के रक्कम (१४६.८ कोटी) नॅशनल क्लीन एनर्जी फंडकडून अनुदान म्हणून मिळणार आहे. तर उर्वरित ४० टक्के रक्कम (१४६.८ कोटी) जर्मन डेव्हलपमेंट बँकेकडून (के.एफ.डब्ल्यू.) कर्ज रूपाने महापारेषण कंपनीस उपलब्ध करुन घेण्यात येणार आहे. या प्रस्तावासही मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

या कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे नवीन वीज पारेषण वाहिन्या उभारुन अतिरिक्त २५७० मे.वॅ. वीज उपलब्ध होऊ शकेल. त्याकरिता आंतरराज्यीय (ISTS) आणि राज्यांतर्गत पारेषण प्रणालीचे (InSTS) बळकटीकरण होणार आहे. याशिवाय अपारंपरिक वीज निर्मिती स्त्रोत उपयोगात आणल्यामुळे पर्यावरणास मदत होण्याबरोबरच पारेषण प्रणाली बळकट होईल. त्यामुळे वीज पुरवठ्याबाबत उद्भवणाऱ्या आकस्मिक परिस्थितीवर मात करणे शक्य होण्यासह पर्यायी स्त्रोत उपलब्ध करुन प्रणालीची विश्वासार्हता वाढेल. अस्तित्वात असलेल्या पारेषण वाहिन्यांवरील भार कमी होईल. एकूण खर्चाच्या ४० टक्के रक्कम केंद्र शासनाच्या नॅशनल क्लीन फंडातून अनुदान स्वरुपात मिळणार असल्याने त्याचाही फायदा ग्राहकांना होणार आहे.

बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत उच्च नवीकरणीय ऊर्जा क्षमता असलेल्या तामिळनाडू, गुजरात, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, राजस्थान आणि जम्मू व काश्मीर या राज्यातून मोठ्या प्रमाणावर नवीकरणीय ऊर्जा निर्माण होऊ शकेल, असे गृहीत धरुन हा कार्यक्रम केंद्र शासनातर्फे राबविण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, केंद्रीय विद्युत प्राधिकरण आणि केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

-----०-----

राज्यातील ४३ शहरांचा समावेश

**केंद्र शासनाच्या अमृत अभियानाची**
**अंमलबजावणी करण्याचा निर्णय**

केंद्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या अटल मिशन फॉर रिज्युव्हनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) या महत्त्वाकांक्षी अभियानाची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या अभियानात राज्यातील ४३ शहरांचा समावेश करण्यात आला आहे.

शहरातील प्रत्येक घरासाठी प्रचलित निकषानुसार पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छतेसाठी मलनि:स्सारण, मलव्यवस्थापन व पर्जन्यजल वाहिनीची व्यवस्था करण्यासह शहरांतील मोकळ्या जागा, हरित क्षेत्रे, परिवहन व्यवस्था यांमध्ये सुधारणा करुन प्रदूषण कमी करणे, तसेच इतर सुविधांची निर्मिती या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हे अभियान राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाने देशातील ५०० शहरांचा समावेश अमृत अभियानात केला असून त्यामध्ये राज्यातील ४३ शहरांचा समावेश आहे. या शहरांमध्ये २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षांच्या कालावधीसाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून या आर्थिक वर्षासाठी एक हजार तीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. त्यादृष्टीने राज्य उच्चाधिकार समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, जिल्हास्तर आढावा व संनियंत्रण समिती आणि सचिव (नगरविकास-२) यांना राज्य अभियान संचालक म्हणून प्राधिकृत करण्यास व त्यानुषंगाने आवश्यक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यास आज मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे राज्य व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यामधील वित्तीय आकृतिबंध, केंद्र शासनाकडून वितरित होणाऱ्या निधीच्या प्रमाणात राज्य शासनाच्या हिश्शाच्या निधीची उपलब्धता करुन देण्यासही मान्यता देण्यात आली.

अमृत अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या क आणि ड वर्ग महानगरपालिका व नगरपरिषदांचे विविध प्रकल्पांचे नियोजन, कार्यान्वयन व पर्यवेक्षणासाठी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना नेमण्यास मान्यता देण्यात आली. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून तीन टक्के इतके प्रकल्प व्यवस्थापन शुल्क आकारण्यासही मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे उर्वरित अभियान शहरांनी त्यांच्या प्रकल्पांचे कार्यान्वयन संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या यंत्रणेमार्फत करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

या अभियानामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका तर ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर, नवी मुंबई, भिवंडी-निजामपूर, उल्हासनगर या महानगरपालिका आणि अंबरनाथ व बदलापूर नगरपरिषदा या आठ शहरांचा समावेश आहे. तसेच पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिका, पुणे जिल्ह्यातील पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका, नाशिक जिल्ह्यातील नाशिक व मालेगाव या दोन मनपा, जळगाव जिल्ह्यातील जळगाव मनपा व भुसावळ नगरपरिषद, सोलापूरमधील सोलापूर मनपा व बार्शी नगरपरिषद, कोल्हापूर जिल्ह्यामधील कोल्हापूर मनपा व इचलकरंजी नगरपरिषद, लातूर जिल्ह्यामधील लातूर मनपा व उदगीर नगरपरिषद, अमरावती जिल्ह्यातील अमरावती मनपा व अचलपूर नगरपरिषद, वर्धा जिल्ह्यातील वर्धा मनपा व हिंगणघाट नगरपरिषद, तसेच सातारा नगरपरिषद, सांगली-मिरज महानगरपालिका, औरंगाबाद मनपा, अहमदनगर मनपा, परभणी मनपा, जालना नगरपरिषद, नांदेड-वाघाळा मनपा, बीड

नगरपरिषद, अकोला मनपा, धुळे मनपा, चंद्रपूर मनपा, रायगड जिल्ह्यातील पनवेल नगरपरिषद, गोंदिया नगरपरिषद, यवतमाळ नगरपरिषद, उस्मानाबाद नगरपरिषद, नंदूरबार नगरपरिषद आणि नागपूर मनपा अशा एकूण ४३ शहरांचा समावेश आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार अमृत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी वित्तीय आकृतीबंध निश्चित करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये केंद्राचा हिस्सा ३३.३३ टक्के, राज्य हिस्सा १६.६७ टक्के आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा ५० टक्के राहणार आहे. तसेच १० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये केंद्राचा हिस्सा ५० टक्के, राज्य हिस्सा २५ टक्के आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा २५ टक्के राहणार आहे.

या अभियानांतर्गत प्राप्त होणाऱ्या वार्षिक अभियान निधीचे प्रकल्प निधी (८० टक्के), सुधारणांसाठी प्रोत्साहन निधी (१० टक्के), राज्य प्रशासकीय व कार्यालयीन खर्च (आठ टक्के), केंद्र शासन प्रशासकीय व कार्यालयीन खर्च (दोन टक्के) असे विभाजन राहणार आहे. या अभियानांतर्गत केंद्र शासनामार्फत प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस प्रकल्प निधी वितरित केला जाणार असून तो राज्याची लोकसंख्या आणि व राज्यात असलेल्या वैधानिक शहरांच्या प्रमाणात मिळणार आहे. हा निधी राज्यास तीन टप्प्यांत वितरित करण्यात येणार असून त्यातील पहिला हप्ता २० टक्के, दुसरा ४० टक्के आणि तिसरा ४० टक्के या प्रमाणात मिळणार आहे.

राज्य कृती आराखडा तयार करताना केंद्र शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त अन्य निधीबाबत राज्य शासन सहाय्य, नागरी स्थानिक स्वराज संस्था स्वहिस्सा व अन्य माध्यमातून नियोजन विचारात घेणे आवश्यक आहे. तथापि अमृत योजनेंतर्गत राज्य कृती आराखड्यासाठी राज्य शासनाचा हिस्सा हा किमान २० टक्के असणे आवश्यक आहे. तसेच अभियानासाठी आवश्यक इतर निधी उभा करताना सार्वजनिक खासगी सहभाग, रोखे या माध्यमातून निधी उभारण्याबाबत विचार करता येईल.

-----०-----

शालेय शिक्षण विभाग

कला, कार्यानुभव आणि शारिरीक शिक्षण विषयांचे शिक्षण

## उच्च प्राथमिक शाळांमध्ये अतिथी निदेशकांचे पॅनल

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ नुसार (आरटीई) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील १०० पेक्षा जास्त पटसंख्येच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये कला, कार्यानुभव आणि शारिरीक शिक्षण या तीन विषयांसाठी अतिथी निदेशकांचे पॅनेल तयार करण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

राज्य मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे १८३५ शाळांमध्ये अशा स्वरुपाचे अतिथी निदेशक नेमणे शक्य होणार आहे. या निदेशकांचे पॅनेल तयार करताना अशा स्वरुपाचे काम करणाऱ्या जुन्या अंशकालीन निदेशकांना प्राधान्याने सामावून घेण्यात येणार आहे. तसेच ज्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये पटसंख्या १०० पेक्षा कमी आहे अशा शाळांमध्येही लोकसहभाग तत्त्वावर शाळा व्यवस्थापन समितीला त्यांच्याकडील उपलब्ध निधीमधून किंवा व्यावसायिक क्षेत्रातील सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) अशा अतिथी निदेशकांचे पॅनल नेमता येणार आहे.

-----०-----

महसूल विभाग

## आयआयएमसीच्या विभागीय केंद्रासाठी
## अमरावतीसाठी जमीन देण्याचा निर्णय

केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ मास कम्युनिकेशनच्या अमरावती येथील विभागीय केंद्रासाठी बडनेरा, अमरावती येथील सहा हेक्टर शासकीय जमीन देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

नवी दिल्ली येथील इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ मास कम्युनिकेशन ही केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने स्थापन केलेली पत्रकारिता आणि संपर्क माध्यमांचे शिक्षण देणारी देशातील एक अग्रगण्य स्वायत्त संस्था आहे. मुद्रण, फोटोग्राफी, रेडिओ, टेलिव्हिजन, जाहिरात, जनसंपर्क माध्यम आदी विषयांचे कौशल्य विकसित करण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेचे विभागीय केंद्र २०११-१२ पासून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिसरात तात्पुरत्या स्वरुपात सुरू आहे. या संस्थेस बडनेरा येथील सहा हेक्टर जमीन विनामुल्य देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अमरावती विभागीय आयुक्तांनी बडनेरा येथील सहा हेक्टर जमीन एक रूपये नाममात्र दराने ३० वर्षांसाठी भाडेपट्टीवर देण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला. या प्रस्तावाला शासनाच्या नियम व अटीनुसार मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर तीन वर्षांच्या आत बांधकामास सुरूवात करणे संबंधित संस्थेस बंधनकारक करण्यात आले आहे.

-----o-----

महसूल विभाग

## पश्चिम विभागीय केंद्रीय इलेक्ट्रिकल टेस्टिंग लॅब
## नाशिक येथे स्थापन करण्यास मान्यता

केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थान (सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिटय़ूट-CPRI) या संस्थेला पश्चिम विभागीय केंद्रीय इलेक्ट्रिकल टेस्टिंग लॅब स्थापन करण्यासाठी शिलापूर (ता.जि.नाशिक) येथे १०० एकर जमीन देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थेची स्थापना १९६० मध्ये करण्यात आली. ही संस्था राष्ट्रीय ऊर्जा संशोधन संघटना म्हणून नॅशनल टेस्टिंग अँड लॅब सर्टिफिकेशन ऑथॉरिटी म्हणून काम पहाते. तसेच ऊर्जा क्षेत्रात उपलब्ध असलेली विद्युत उपकरणे आणि सयंत्रे यांच्या दर्जा आणि विद्युत दर प्रमाणीकरण करण्याचे कार्यही या संस्थेमार्फत करण्यात येते. या संस्थेने पश्चिम विभागीय केंद्रीय इलेक्ट्रिकल टेस्टिंग लॅब स्थापन करण्यासाठी शासनाकडे जागेची मागणी केली होती. राज्यातील विद्युत निर्मिती करणाऱ्या सर्व प्रकल्पांना सर्व प्रकारच्या विद्युत संचांचे परिक्षण करण्यासाठी या प्रयोगशाळेची मदत होणार असल्याने तसेच अशा स्वरुपाची प्रयोग शाळा राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील प्रगतीसाठी आवश्यक असल्याने शासनाने त्यासाठी जागा देण्याचा निर्णय घेतला.

या संस्थेस १०० एकर जमीन नाममात्र एक रूपया दराने ३० वर्षांसाठी भाडेपट्टीवर देण्यात येणार आहे. राज्य शासन किंवा राज्य शासनाचे उपक्रम असलेल्या विद्युत कंपन्यांची उपकरणे, संयंत्रे, संच आदींची तपासणी, इतर सेवा तसेच अभियंत्यांना प्रशिक्षण देण्याबाबतच्या दरामध्ये २० टक्के कायमस्वरूपी सवलत संस्थेतर्फे देण्यात येणार आहे.

-----o-----

नगर विकास विभाग

## इंदू मिलच्या जागेवरील डॉ.बाबासाहेबांच्या स्मारकासाठी शशी प्रभू अँड असोसिएट्च्या आराखड्याची निवड

मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रस्तावित स्मारकासाठी वास्तुविशारद शशी प्रभू अँड असोसिएट्स यांनी सादर केलेला आराखडा स्वीकारण्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

मंत्रिमंडळाच्या यापूर्वीच्या बैठकीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रस्तावित स्मारकासाठी अंतिम चाचणीसाठी पात्र ठरलेल्या शशी प्रभू अँड असोसिएट्स आणि फ्रान्समधील जेकब मॅक फर्लेन या दोन संस्थांच्या आराखड्यांचे सादरीकरण झाले होते. त्यावेळी मंत्रिमंडळाने याबाबत निर्णय घेण्याचे सर्वाधिकार मुख्यमंत्र्यांकडे सोपविले होते. त्यानुसार आज मुख्यमंत्र्यांनी शशी प्रभू अँड असोसिएट्स या संस्थेचा आराखडा स्वीकारल्याचे जाहीर केले.

-----०-----

नगर विकास विभाग

## जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास बंदी

महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायती यांच्या निवडणुकीत खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे आरक्षित संवर्गातून निवडून आलेल्या तसेच जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या त्या व्यक्तीवर सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास बंदी घालण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

राज्यातील नागरी भागात आरक्षित संवर्गातून निवडणूक लढविताना प्रत्येक उमेदवाराला जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, इच्छूक उमेदवारांना केवळ जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे निवडणूक लढविण्याच्या संधीपासून वंचित राहावे लागू नये यासाठी एप्रिल २०१५ मध्ये कायद्यात सुधारणा करण्यात आली. मात्र निवडणूक लढविताना नामनिर्देशन पत्रासोबत सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची हमी दिल्यानंतर उमेदवारांना निवडणूक लढविता येऊ शकत होती, यामुळे अनेक उमेदवारांना याचा फायदा झाला आहे. ही सूट दिल्यामुळे बोगस किंवा अपात्र उमेदवारांनी राखीव किंवा आरक्षित संवर्गातून निवडणूक लढविण्याच्या गैरप्रकारास आळा घालण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे. त्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार आरक्षित संवर्गातून निवडून आलेल्या उमेदवाराने खोटे दावे किंवा खोट्या प्रमाणपत्राचा आधार घेतला आहे, असा निर्णय सक्षम प्राधिकरणाने दिल्यास संबंधित व्यक्तीवर सहा वर्षांच्या कालावधीकरिता निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----०-----

कृषी/मदत व पुनर्वसन

## राज्यात सरासरीच्या ६० टक्के पाऊस, ५६ टक्के पाणीसाठा

गेल्या काही दिवसात राज्यात हलक्या स्वरुपाचा पाऊस पडला. आजपर्यंत ६७८.५ मि.मी. पाऊस झाला असून तो ११३१ मि.मी. या सरासरीच्या ६० टक्के आहे. राज्यातील सर्व जलप्रकल्पांत ५६ टक्के एवढा साठा आहे.

राज्यात सरासरीच्या तुलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार जिल्ह्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणे- धुळे, नंदूरबार, पुणे, औरंगाबाद, बुलढाणा,अकोला, वाशिम,अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या १३ जिल्ह्यांत ७६ ते १०० टक्के पाऊस झाला आहे. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, अहमदनगर, सातारा, सांगली, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, चंद्रपूर या १७ जिल्ह्यांमध्ये ५१ ते ७५ टक्के पावसाची नोंद झाली असून नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, परभणी या ४ जिल्ह्यांत २६ ते ५० टक्के पाऊस पडला आहे.

राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी फक्त एका तालुक्यात सरासरीच्या तुलनेत ० ते २५ टक्के, ४९ तालुक्यांत २६ ते ५० टक्के, १७१ तालुक्यांत ५१ ते ७५ टक्के, १०५ तालुक्यांत ७६ ते १०० टक्के आणि २९ तालुक्यांत तर १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

### सोयाबीन, मूग, उडीद, बाजरीची काढणी तर कापसाच्या वेचणीस सुरुवात

राज्यातील खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १३४ लाख ७० हजार हेक्टर असून २४ सप्टेंबर अखेर १३१ लाख ५९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राच्या तुलनेत ९८ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

भात पीक फुटवे फुटणे,पोटरी ते निसवण्याच्या अवस्थेत आहे. खरीप ज्वारी पीक फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत, बाजरी पीक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. मका पीक वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहे. तूर पीक वाढीच्या अवस्थेत, उडिद व मुग पिके शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणी प्रगतीपथावर आहे. सोयाबीन पीक शेंगा धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. कापूस पीक पाते, फुले व बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे, तर काही ठिकाणी वेचणीस सुरुवात झाली आहे.

### धरणात ५६ टक्के पाणी साठा

राज्यातील सर्व जलप्रकल्पांत ५६ टक्के साठा असून गेल्या वर्षी याच सुमारास ७८ टक्के साठा होता. प्रकल्पातील विभागनिहाय आजचा आणि कंसात गतवर्षी याच दिवशीचा साठा पुढीलप्रमाणे-

मराठवाडा - १५ टक्के (४३), कोकण - ८७ टक्के (९५), नागपूर - ७७ टक्के (७८), अमरावती- ७२ टक्के (७६), नाशिक - ५९ टक्के (८२) आणि पुणे - ५९ टक्के (९२), इतर धरणे - ७३ टक्के (९१) असा पाणीसाठा आहे.

### राज्यात टँकर्सच्या संख्येत घट

राज्यातील ७८० गावे आणि १७३८ वाड्यांना आजमितीस ९६९ टँकर्सद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसात झालेल्या पावसामुळे टँकर्सची संख्या मोठ्या प्रमाणात घटली आहे. मागील वर्षी याच सुमारास ३८ टँकर्सद्वारे पुरवठा करण्यात येत होता.

-----o-----

## सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचा सत्कार

**मुंबई, दि. ३० :** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल नाशिकचे पालकमंत्री तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांचा मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

दर बारा वर्षांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यानिमित्ताने नाशिक, त्र्यंबकेश्वर परिसरात शासनातर्फे मोठ्या प्रमाणावर विविध स्वरुपाची कामे पूर्ण करण्यात आली. या साऱ्या कामांची कार्यवाही यशस्वीरित्या पूर्ण झाली. कुंभमेळ्याच्या तयारीत सुसूत्रता व समन्वय राखून सर्व कामांची अंमलबजावणी व्हावी यासाठी जलसंपदा मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री यांची कुंभमेळा मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

श्री. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळा यशस्वीरित्या पार पडला. या कुंभमेळ्याच्या कालावधीत नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात देशभरातील सुमारे दोन कोटी भाविकांनी आपली हजेरी लावली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थिती असतानाही कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. विविध सोयी-सुविधा यशस्वीपणे वितरीत करण्यात आल्या. त्यामुळे सर्व भाविक तसेच साधु-संतांमध्ये समाधानाचे वातावरण होते. त्यामुळे आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी श्री.महाजन यांचा सत्कार केला.

ooooo